# मिरा- भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्र. : 819 2828.

जा.क्र./मनपा/मध्यवर्ती भांडार/ २५९ /२०२५-२६ दि. २०/ ०१ /२०२६

## // फेर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या खालील कामाकरिता मोहोरबंद दर ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म **दि. २१/०१/२०२६ ते दि. ३०/०१/२०२६** रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या e-Tendering संकेत स्थळ as http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील. निविदाधारकाने निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम ऑन लाईन भरणा करावी. अन्यथा निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.

सदर कामी मागविलेल्या मोहरबंद निविदा **दि.०२ /०२/२०२६** रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील व **दि. ०३/०२/२०२६** रोजी दुपारी १२.३० वाजता निविदाधारकांच्या उपस्थितीत अथवा अनुपस्थितीत ऑनलाईन उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार, आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे. (निविदा मंजुर रक्कम रु.१३.०० लक्ष) (अक्षरी रुपये तेरा लाख मात्र)

| **अ.क्र.** | **तपशिल** | **फॉर्म फी + GST कर १८%** | **अनामत रक्कम (EMD)** |
|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणेबाबत. | रु. ५,७००/- + रु.१०२६/- = रु.६,७२६/- | रु. ९५,०००/- |

१) अपुर्ण असलेले फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.

२) वैधता कालावधी :- सदर निविदाधारकाने भरलेले दर १२० दिवसासाठी वैध राहतील.

३) निविदापत्रक हे करारनाम्याचा एक भाग म्हणून गणला जाईल.

४) निविदाधारकाने खालील माहिती सविस्तरपणे सादर करावी. जसे कंपनीचा प्रकार (उदा. स्वत:चा व्यवसाय, भागीदारी, खाजगी किंवा सार्वजनिक कंपनी) त्याचबरोबर स्वत: साक्षांकित केलेल्या संस्था/कंपनी संबंधीत छायांकित प्रती तसेच सदर निविदेकामी आपल्या संस्था/कंपनीचे प्रतिनिधीत्व करणेसाठी नियुक्त केलेल्या जबाबदार व्यक्तीचा तपशील सादर करणेत यावा.

५) निविदा फॉर्म फी परत केली जाणार नाही.

६) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्वच निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

**(प्रणाली घोंगे)**
**उप-आयुक्त (मध्यवर्ती भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhaindar (W.) 401101, Tal, Dist – Thane.
Tel - 28192828


MBMC/Central Store/ 259 /2025-26 Date :20 /01 /2026

## // Re-Tender Notice //

Mira Bhainder Municipal Corporation inv ites sealed tender forms for following Work in MBMC in the form of e-Tendering The tender form and other relevant document will be available for download on MBMC's e-Tendering website as https://mahatenders.gov.in from **21 /01 /2026 to 30/ 01/2026** till 12.00 pm. Tender Form Fee and EMD Should be submitted online, failing which the tender will be disqualified.

The last date for submission of tenders completed in all respects is **02 /02 /2026** up to 12:00 pm on the above mentioned website. The tenders shall be opened in the presence or absence of the bidders or their representatives on **03/ 02 /2026** at 12:30 pm at the tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhayander Municipal Corporation reserves right to accept or reject any or all bids, without assigning any reasons thereof. (Tender Estimated amount Rs. 13.00 lakh) (In word Thirteen lakh only)

| Sr.No | Particulars | Form Fees + GST Tax 18% | EMD Deposit |
|---|---|---|---|
| 1. | Regarding the supply of daily newspapers, weeklies, fortnightly newspapers, Diwali issues and magazines etc. for Mira Bhayandar Municipal Corporation for the years 2025-26 and 2026-27. | Rs. 5,700/- + Rs.1026/- = Rs.6,726/- | Rs. 95,000/- |

1. Incomplete forms will not be accepted.
2. The rates quoted by the bidder shall remain valid for a period of 120 days.
3. The Tender Notice shall be a part of Contract agreement.
4. The Tenderer should furnish detailed information regarding status of his firm (i.e. Proprietary, Partnership, Private Ltd. Or Public Ltd. Company etc.) And also produce self-attested copies of the proof thereof. The Tenderer should also specify the authorized person who will be transacting with MBMC (power of attorney holder)
5. Tender Form Fee is non-refundable.
6. The Commissioner of Mira Bhayandar Municipal Corporation reserves the right to reject any or all tenders without assigning any reason whatsoever.

**(Pranali Ghonge)**
**Deputy Commissioner (Central Stores)**
**Mira Bhayander Municipal Corporation**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्र. 819 28 28.

## // मध्यवर्ती भांडार विभाग //

## // निविदा दरसुची //

## सन 2025-26

**कामाचे नाव :- मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणेबाबत.**

**WORK NAME :-** Regarding the supply of daily newspapers, weeklies, fortnightly newspapers, Diwali issues and magazines etc. for Mira Bhayandar Municipal Corporation for the years 2025-26 and 2026-27.

निविदा भरणा-याचे संपुर्ण नाव, संपुर्ण पत्ता (पिन कोड सहित), दुरध्वनी क्र., भ्रमणध्वनी क्र. ------------------
------------------------------------------------------------------------------------------

Full Name & Full Address (with pin code), Telephone No., Moblie No. of Bidder.
------------------------------------------------------------------------------------------------------------

निविदा भरणा-या संस्थेचे नाव :- ------------------------------------------------------------------------------------

Name of Company / Organization :-----------------------------------------------------------------

अनामत रक्कम रुपये ---------------------- अक्षरी रुपये -------------------------------------------------

EMD Rs. --------------------------------------- In Words Rs. ---------------------------------------

चलन क्र. ---------------------- दिनांक ------------------------- बँकेचे नाव --------------------------------

Challan No. ------------------- Date ------------------- Name of Bank ----------------------------

| अ.क्र. | तपशील (particular) | दर (सर्व करासह)<br>Rate (including All taxes) |
|---|---|---|
| 1. | दैनिक वृत्तपत्रे<br>Daily News Papers | --------------% (छापील किंमतीवर सुट) |
| 2. | साप्ताहिके वृत्तपत्रे<br>Weekly News Papers | --------------% (छापील किंमतीवर सुट) |
| 3. | पाक्षिके<br>Fortnightly | --------------% (छापील किंमतीवर सुट) |
| 4. | मासिक<br>Monthly Messenger | --------------% (छापील किंमतीवर सुट) |
| 5. | दिवाळी अंक<br>Diwali Magazines | --------------% (छापील किंमतीवर सुट) |

**टिप :-** लिफाफा क्र. 1 (ENVELOP NO- 1) व लिफाफा क्र. 2 (ENVELOP NO- 2) संबधी अटीशर्ती (Terms & Condition)

- **लिफाफा क्र. 1** (ENVELOP NO- 1) मध्ये खालीलप्रमाणे online कागदपत्रे सादर करावीत.

**Terms & Condition (अटीशर्ती)**

1. **निविदेची फी**
   Tender Form Fee (Scan copy)
2. **बयाणा रक्कम**
   Earnest Money Deposit (EMD) (Scan copy)

3. **पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबधित कंपनी / भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.)**

   Copy of PAN Card (If a company / partnership is submitting the tender, it is mandatory to have the PAN card in the name of the concerned company / partnership. In case of proprietary firms, the PAN proprietary firms should be in the name of the proprietor. (Scan copy)

4. **निविदाधारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्स इत्यादी संबंधित संस्थाचे नोंदणी प्रमाणपत्र.**

   Registration certificate of the Bidder`s company / partnership / proprietary firms etc. (Scan copy)

5. **निविदाकाराला शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही, याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र.**

   An undertaking on the tenderer`s letter head stating that the tenderer has not been blacklisted by any Government / Semi-Government. (Scan copy)

6. **निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.**

   An Affidavit on stamp paper of Rs. 500/- attesting to the authenticity of the documents submitted by the tenderer along with the tender. (Scan copy)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## निविदा पत्रकाविषयी अटी व शर्ती सन 2025-26

1. निविदा पत्रकसंबधीची सविस्तर माहिती संबधित खात्यात किंवा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर विनामुल्य मिळेल.
2. निविदा ई-टेडरींग पध्दतीने मागविणेत येत आहे. याची नोंद घ्यावी.
3. निविदा अनामत रक्कम व निविदा फॉर्म फी ई-टेडरींग संकेत स्थळावर उपलब्ध ऑनलाईन रिसीट सिस्टीमव्दारे स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.
4. सर्व निविदाकारांनी निविदेत नमुद असलेले दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच Technical Bid मध्ये पात्र ठरलेले निविदाकारांनी दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठ्याचे दर अपुर्ण भरलेले असल्यास Financial Bid उघडल्यानंतर सदर निविदाकार अपात्र ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.
5. मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठ्याचे काम पुर्ण झाल्यानंतर अनामत रक्कम मूळ पावतीसह अर्ज प्राप्त झाल्यास परत देण्यात येईल. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
6. निविदाधारकाने ई-टेड़रिंगव्दारे दर व आवश्यक माहिती भरली पाहिजे. तसेच निविदाधारकाने निविदेमध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन सोबत जोडणे आवश्यक आहे.
7. महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येतील. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील.
8. निविदा स्विकारल्यानंतर पुरवठादाराला लेखी कळविण्यात येईल आणि तसे कळविल्यानंतर पुरवठादार यांनी पुरवठ्याबाबत स्वखर्चाने अधिकृत स्टॅम्पपेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहिल.
9. पुरवठादाराने करारनामा लिहून दिल्यावर कार्यादिशात नमुद केलेल्या मुदतीत दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणे बंधनकारक राहिल.
10. पुरवठादाराने मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठ्याचे दर नमुद करताना ते सरकारी कर व इतर सर्व कर तसेच महानगरपालिकेच्या कार्यालयात दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. आणेपर्यंत होणा-या सर्व वाहतूक व हमाली या सर्व खर्चासह लिहावेत.
11. पुरवठादाराने मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा केल्यानंतर दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके यांची गुणवत्ता, दर्जा परिमाण याबाबत तक्रारी असल्यास त्याबाबत महानगरपालिकेची तक्रार प्राप्त झाल्यापासुन तात्काळ सदर तक्रार दुर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच सदर तक्रारीचे निवारण मुदतीत न केल्यास व निविदा पत्रक किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचे उल्लंघन केल्यास महापालिकेने 24 तासाची नोटीस दिल्यानंतर सदर करारनामा रद्द करण्यात येईल व महानगरपालिकेस होणारे सर्व नुकसान व त्याचे भरपाईस पुरवठादार जबाबदार राहतील.
12. पुरवठादाराने मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करताना सोबत चलन देणे आवश्यक आहे. चलनाशिवाय वृत्तपत्रे स्विकारली जाणार नाही किंवा तद्नंतर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
13. महानगरपालिकेने मागणी केलेल्या प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठ्याचे काम

पुरवठादाराने विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पुरवठादाराकडून खरेदी करुन घेण्यात येईल आणि ज्यादा होणारा आकार इसारा रक्कमेमधून वसुल केला जाईल.

14. पुरवठादाराने संपुर्ण दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. सुस्थितीत महानगरपालिकेच्या कार्यालयात किंवा निर्देशित करण्यात येईल अशा ठिकाणी स्वखर्चाने पोहोच केला पाहिजे. फाटलेले किंवा खराब झालेले दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके स्विकारण्यात येणार नाही. तसेच सदरची वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके पुरवठा केल्यानंतर वापराचे वेळी खराब / वापरण्यास अयोग्य असल्यास किंवा पॅकिंग काढली असल्यास सदरची वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके परत घेवून नविन पुरवठा करणे बंधनकारक राहील.
15. पुरवठादाराने मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा खंडीत केला अथवा निविदा अटीशर्तीचा भंग केल्यास किंवा वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके पुरवठ्याबाबत संबधित खात्याकडून तक्रार आल्यास पुरवठादाराची इसारा रक्कम जप्त करुन त्यांची व्दिवार्षिक निविदा रद्द करुन काळ्या यादीत नाव टाकण्यात येईल.
16. मंजुर निविदाधारकाकडून नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर देयकातून कपात करण्यात येतील.
17. निविदा पत्रकातील स्पेसिफिकेशन नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करुन मिरा-भाईंदर क्षेत्रातील तसेच विविध विभागाच्या मागणीनुसार पुरवठा करुन त्या त्या ठिकाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील.
18. निविदा फॉर्म मधील सर्व अटीशर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.
19. मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणेकामी उभय पक्ष यामध्ये काही वाद उपस्थित झाल्यास मा. न्यायालय ठाणे हे न्यायाधिरण असेल.
20. कामापोटी अथवा मटेरिअलवर कोणत्याही प्रकारची ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही, तसेच कार्यान्वित नसलेले वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके स्विकारले जाणार नाहीत. जो माल स्विकारला जाणार नाही त्याचे देयक अदा केले जाणार नाही.
21. शासनाने अप्रमाणित केलेले व मुदत बाह्य झालेली वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके स्वखर्चाने त्वरीत परत नेला पाहिजे व बदलून नविन दिला पाहिजे.
22. पुरवठादाराने माल वितरकामार्फत पुरविला जाणार असल्यास त्या वितरकांचे नाव व पत्ता निविदापत्राबरोबर नमुद केला पाहिजे. तसेच वितरक संमती दाखल करणे आवश्यक आहे.
23. पुरवठादाराची निविदा नामंजुर झाल्यास त्यांनी इसारा रक्कमेची मूळ पावती जोडून रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास रक्कम परत करण्यात येईल व त्यावर महानगरपालिकेकडून कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
24. पुरवठादारांनी निविदा सादर करताना निविदेतील अटीशर्ती मान्य असल्याबद्दल त्यावर सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.
25. नैसर्गिक आपत्ती उदा. आग, पुर, वादळ, वीज पडणे, भुकंप, ज्वालामुखी तसेच अपघात यामुळे व संप, संचारबंदी, टाळेबंदी यामुळे होणा-या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महानगरपालिका जबाबदार असणार नाही. कुठलीही भरपाई मिळणार नाही.

26. ठेकेदारासोबत केलेल्या करारनाम्यावर दोन साक्षीदार 1) मा. अतिरिक्त आयुक्त व मा. उप-आयुक्त यांची साक्षांकित केलेल्या करारनाम्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचित ड मधील नियम 1 प्रकरण 5 नुसार रु.500/- पेक्षा जास्त रकमेचा समावेश असलेले कंत्राट मनपाच्या मुद्रेसहित शिक्का मोर्तब करुन,

नियम 2 मध्ये नमुद केल्यानुसार मा. नगरसचिव यांची स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी मंजुर निविदाधारकाची राहिल.

27. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, असाधारण क्र. 47 दि. 14/10/2024 MAHARASHTRA ORADINANCE No. XII OF 2024 AN ORADINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT. मधील अनुच्छेद क्र. 27 व अनुच्छेद क्र. 63 मधील अ, ब, क, ख मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 5 लक्षपर्यंत 500/- व त्यापुढील (रक्कमेच्या 0.3% दराने) मुद्रांक जोडणे आवश्यक आहे.
28. मंजुर निविदाधारकास निविदेच्या रक्कमेवर कमीत कमी 3% इतकी सुरक्षा अनामत रक्कम कोणत्याही अनुसुचित वाणिज्यिक बँक / राष्ट्रीयकृत बँकेतील कराराच्या कालावधीत वैध राहणा-या बँकेच्या हमीव्दारे / डिमांड ड्राफ्टव्दारे जमा करावा.
29. मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षाकरिता दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणेकामी निविदेतील दरसुचीमध्ये दिलेले परिमाण हे व्दिवार्षिक असुन महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार मध्यवर्ती भांडार विभागाने वेळोवेळी दिलेल्या कार्यदिशान्वये मुदतीत मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक राहिल.
30. कोणतीही निविदा पुर्णपणे किंवा अशंत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राखीव आहे.

**(प्रणाली घोंगे)**
**उप-आयुक्त (मध्यवर्ती भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,
**मा. उप-आयुक्त**
मध्यवर्ती भांडार
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असुन त्यासंबधीची सर्व माहिती समजावून घेतली आहे. निविदेसंबधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

जर आम्हास निविदा मंजुर झाल्यास महानगरपालिकेच्या वेळोवेळी मागणी पत्रकाप्रमाणे सर्व मालाचा पुरवठा वेळेवर व मुदतीत करण्याची जबाबदारी माझी / आमची असेल या निविदाचे अटी व शर्ती मला / आम्हाला बंधनकारक आहेत.

दिनांक

निविदाधारकांची सही.

शिक्का

नाव :- ----------------------------------

संपुर्ण पत्ता :- ---------------------------
---------------------------
---------------------------